खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरूनगर

ता. खेड, जि.पुणे

## भूगोल विभाग

## स्वच्छता अभियान

हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या भूगोल विभागातर्फे दरवर्षी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष 2024–25 मध्ये भूगोल विभागाने ग्रीन क्लब या कमिटीच्या बरोबर परिसरर स्वच्छता अभियान हा उपक्रम राबविला. या अभियानांतर्गत भूगोल विभागाचे विद्यार्थी सिद्धेश्वर मंदिरर परिसरात गेले आणि त्यांनी तेथे परिसराची स्वच्दता केली.

राजगुरूनगर गावातील सिद्धेश्वर मंदिर हे महाविद्यालयाच्या परिसरात आहे. हे मंदिर भीमा नदीच्या काठी रम्य ठिकाणी आहे. हे एक प्राचीन मंदिर समजले जाते. या मंदिराचा उल्लेख संत नामदेवांच्या गाथेमध्ये येतो. सिद्धेष्वर मंदिराशेजारी एक कुंडही आहे. मंदिराच्या भोवती अनेक वृक्ष आहेत.

या परिसरात नेहमी वृक्षांची पानगळ होत असते. अनेक वृक्ष असल्याने परिसर रम्या झाला असला तरी तेथे अनेक पक्षी येतात. या पक्षांची विष्ठा परिसरात पडत असते. या शिवाय अनेक भाविक येतात. या भाविकांनी टाकलेले कागद, खाद्य पदार्थ, निर्माल्य वगैरे वस्तू मंदिर परिसरात पडतात. त्यामुळे परिसरात कचरा होतो. भूगोल विभागातील विद्यार्थ्यांनी हा कचरा साफ करण्याचे ठरविले.

दि. 17/02/25 रोजी भूगोल विभागातील सुमारे वीस विद्यार्थ्यांना बरोबर घेऊन भूगोल विभागातील प्राध्यापक डॉ. डी.एम. मारकड सिद्धेश्वर परिसरात गेले. तेथील कुंडाची आणि परिसराची पाहणी केल्यानंतर विद्यार्थ्यांनी हातामध्ये झाडू घेतले. संपूर्ण सिद्धेश्वर परिसर लख्ख झाडून काढला. कचरा एके ठिकाणी एकत्र करून त्यास नदीच्या काठी खड्डा खणून पुरला. डॉ. डी.एम. मारकड यांनीही हातात झाडू घेवून परिसराची स्वच्छता केली. यानंतर सिद्धेश्वराचे दर्शन घेऊन आणि परिसराची पाहणी करून विद्यार्थी पुन्हा महाविद्यालयात परत आले.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अनुमती दिली. विभागप्रमुख डॉ. दिलीप मुळूक यांनी मार्गदर्शन केले. डॉ. डी.एम.मारकड यांनी उपक्रमाची कार्यवाही केली.




भूगोल विभागाती विद्यार्थी सिद्धेश्वर मंदिराची स्वच्छता करताना.




भूगोल विभागाती विद्यार्थी सिद्धेश्वर मंदिराची स्वच्छता करताना.




भूगोल विभागाती विद्यार्थी सिद्धेश्वर मंदिराची स्वच्छता करताना.

विभाग प्रमुख
भूगोल विभाग
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, (खेड) जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.